PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 5, ISSUE 4

# ग्रामीण संस्कृती आणि समाज

**प्राचार्य डॉ. ह. रा. जाधवर**
सरहद्द कॉलेज, कात्रज, पुणे
**महाराष्ट्र भारत**

डॉ मधुकर वाकोडे म्हणतात, “लोकगीते ही सर्व सामान्यांची निर्मिती असल्याने समाजाच्या विविध स्तरांचे त्यास प्रतिबिंब पडले त्यांच्या भाव-भावना, इच्छा, आकांक्षा, रूढी-परंपरा, आचार-विचारांचे स्वच्छ दर्शन त्यातून घडते.” याच तत्त्वास अनुसरून ग्रामीण भागातील लोकांच्या रूढी, रीतीरिवाज, परंपरा, त्यांचे आचार-विचार, इच्छा-आकांक्षा यांचे दर्शन प्रस्तुत लेखिकेने चित्रित केले आहे. पूर्वजांपासून सुरू असलेल्या पूजाअर्चा, नवस, देवदेवतांची गाणी, सणवार, उत्सव, व्रतवैकल्ये, आपण पिढ्यान्पिढ्या सुरू ठेवतो. समाजाला या सर्व रूढी, रीतीरिवाज व परंपरांतूनच करमणूक व मनोरंजनाची साधने उपलब्ध झाली आहेत. त्यातून समाज सुसंस्कृत कसा होईल हे ठरवायचे असते. लेखिकेने उल्लेख केल्याप्रमाणे या लोकगीतांतील गाणी तीन प्रकारात मोडली जातात. (1) भुलाईची गाणी, (2) झेंडबाईची गाणी, (3) दिवाळीची गाणी. या गाण्यांमधून ग्रामीण संस्कृतीचे दर्शन दिसून येते.

**1) 'भुलाईची गाणी' -**

विदर्भातील कोजागिरी पोर्णिमेला भुलाबाईंची महिनाभर पूजा करतात, गाणी म्हणतात, प्रसाद (खिरापत) वाटतात. आजकाल कुणी पाच दिवस तर कुणी एक भुलाबाई बसवतात. भुलाबाई हे स्त्रीचेच रूप. कारण स्त्रीला सासरच्या-माहेरच्या लोकांचा वेगवेगळा अनुभव येतो. त्रास, छळ, अवहेलना होऊनही स्त्रीची सहनशीलताच दिसून येते. विशेषतः स्त्रीच स्त्रीला त्रास देते. तिची अवहेलना करते. सासरी गेल्यावर सुनेचा संबंध सासूशी जास्त येतो. सासू मोठी खाष्ट, कजाग, कठोर असे भुलाबाईच्या गाण्यामधील चित्र दिसून येते. पण पती मात्र नेहमी पत्नीची काळजी घेताना दिसतो. तसेच मुलीचे लग्न झाल्यावर सासरचे लोक तिला कसे वागवतात ? कसा त्रास देतात ? तो त्रास मुलगी कसा सहन करणार ? कुणाला सांगणार? अशा वेळेस मुली माहेरचे गुणवर्णन करून सासर किती वाईट आहे हे सांगतात. या सर्व गोष्टीचे विवरण भलाबाईच्या गाण्यांमधून करताना सासुरवाशिणीच्या मनातील व्यथा व्यक्त झालेल्या दिसून येतात. तरीही आज मुली, स्त्रिया मोठ्या प्रमाणावर मनोरंजनाच्या, करमणुकीच्या साधनांकडे वळलेल्या दिसतात. नाटक, चित्रपट यांमधून वेशभूषा, केशरचना, निरनिराळे अंगविक्षेप, गाण्या-नाचण्यातून दिसणा-या आक्षेपार्ह वागण्याचेच त्या अनुकरण करतात. या सर्व गोष्टीचे लहानपणापासून वळण पडल्यामुळे फॅशनच्या नावाखाली ब-यावाईट घटना घडतात. मुलींना भुलाईतील गाण्यांपेक्षा चित्रपटांतील गाणी आवडतात. त्याचे बरेवाईट परिणाम स्पष्टपणे दिसून येतात.

म्हणून नवे राहणीमान व विचारसरणीवरून हा प्रश्न पडतो की भुलाईची गाणी कालानुरूप संपुष्टात येणार तर नाहीना ? भुलाबाईच्या गाण्यासारखेच नवीन गाणे मुलींना

तयार करून घ्यावे लागेल. कारण त्यानंतरच्या पिढीला त्याचा उपयोग व्हायला हवा. नातीला त्यातून खूप काही घेता येईल व चिरंतन आदर्श निर्माण करता येईल असा त्या विचार व्यक्त करतात.

**2) <u>झेंडवाईची गाणी (दिवे)</u> :**

ही गाणी आज भुलाबाईच्या गाण्यांप्रमाणे मागे पडत चालली आहेत. गुरे-ढोरे काबाडकष्ट करून मालकाला सुखी करण्याचा प्रयत्न करतात. दिवसभर शेतात राबून अन्नधान्य, पीक घेण्यास मदत करतात. त्यासाठी 'झेंडवाई' ची पूजा करतात. म्हणून गुराखी म्हणतो

**"आली रे दिवाई गायक्या करतो झेंडवाई**

**दिवा करतो भाताचा चवूक करतो मोठ्याचा' '**

**दिवाळीच्या आधी म्हणजे कोला**

**('बयनाचे बोल' , पृ. क्र. 39)**

दिवाळीच्या आधी म्हणजे कोजागिरी पौर्णिमा झाली की झेंडवाई काढतात. भाताचा दिवा करतात. रोज एक याप्रमाणे नऊ दिवस ही झेंडवाई गावातून दिवे लावून फिरवतात. गुराढोरांना चरायला नेणारे गायकी व ढोरकी त्यांना ओवाळतात. त्यांच्या सुखसमाधानासाठी आयुष्य मागतात, तसेच त्यांचे उपकार, त्यांचे कष्ट विसरण्यासारखे नसतात. परंतु आजच्या धकाधकीच्या काळात, औद्योगिकीकरणाच्या युगात लोकांना आपल्या गुराढोरांची पूजा करावीशी वाटत नाही. ज्या समाजात आपण राहतो त्या

शेतमालकांना जाणीव असायला हवी की, मुक्या जनावरांचे आपण काही देणे लागतो. त्यांनी केलेली मेहनत; 'वागवलेले ओझे' हे फक्त शेतक-यापुरतंच नसून सर्व समाजासाठी आहे. प्रस्तुत लेखिका म्हणते, "झेंडवाईची गाणी व त्या गाण्याचा अर्थ किती महत्त्वपूर्ण आहे हे आज प्रत्येकाने समजावून घेणे गरजेचे आहे. गुराढोरांची मालकाची, गावाची सुखशांती, श्रमसाफल्य, मांगल्या झेंडवाईच्या गाण्यात ओतप्रोत भरलेले आहे. समाजात पसरलेला अंधार नाहीसा होण्यासाठीच आज झेंडवाईच्या गाण्याची-दिव्यांची नितांत आवश्यकता आहे. गुराढोरांच्या प्रेमापोटी झेंडवाईचे गाणे म्हणणे आज महत्त्वपूर्ण झाले आहे!"

पारंपरिक लोकगीतांतील भुलाबाईची गाणी आणि झेंडवाईची गाणी प्रचलित संस्कतील समाजाला अनुसरूनच रचलेली आहेत. समृद्धीने नटलेली, मांगल्याने फुललेली ही गाणी ग्रामीण संस्कृतीचा वसा आहे. "बाळाच्या प्रेमापोटी आई जशी अंगाई गीत गाते तसं गुराच्या प्रेमापोटी तुम्ही हे गीत गाता." (झेंडवाईचे दिवे' , पृ. क्र. 43) भावार्थाने आशय व्यक्त करणारे हे गाणे पसायदानासारखे महन्मंगल वाटते. अशा प्रकारे झेंडवाईच्या गाण्याचे महत्त्व आहे. ते जोपासणे आज काळाची गरज आहे असे त्यांना वाटते.

3) **दिवाळीची गाणी** :

लोकगीतातील भुलाबाईची गाणी आणि झेंडवाईची गाणी यासोबत दिवाळीची गाणीही अस्तित्वात आहेत. हिंदू संस्कृतीत दिवाळी हा मोठा आणि मुख्य सण आहे. पाच दिवस दिवाळीचा दीपोत्सव करून पूजा करतात. लक्ष्मीपूजन, विविध खाद्यपदार्थ, नवनवीन कपडे घालणे, दिव्यांची आरास करणे, फटाके यांसह भाऊबीज, आनंदाने गाणे म्हणून नृत्य करणे अशा प्रकारे दिवाळी साजरी करण्यात येते.

आपल्या कृषिप्रधान देशात दिवाळीला वेगळेच महत्त्व आहे. शेतकरी हा कष्ट करतो. धन-धान्य पिकून घरी आणण्याची वेळ झाली म्हणजे खूप आनंदित होतो. त्याचवेळस दिवाळीचा सण येतो व उसंत मिळताना मग शेतक-याला आराम असतो. तोही दिवाळी उत्साहाने साजरी करतो. घरी सर्वांसाठी नवीन कपडे आणतो. घरात गोडगोड पदार्थ करतात. घरात धनधान्य असते. त्यामुळेच त्या लक्ष्मीची, धनाची पूजा करतो. ती तशीच टिकून राहावी म्हणून तिची आळवणी करतो. म्हणून म्हणतात-

“चारी संध्याकाय झाली लक्ष्मी आली घरा

वाटो वोटी तांद्यान भरा’ ’

(‘बयनाचे बोल’ , पृ. क्र. 38)

लोकसाहित्यातील दिवाळीला वेगळेच महत्त्व आहे. त्यातील तीन प्रकारच्या गाण्यांना महत्त्व आहे. 1) गुराख्याची गाणी 2) सासुरवाशिणीची गाणी 3) गवळ्याची गाणी

शेतक-याना गाई, म्हशी, बैल, शेळ्या या पाळीव मुक्या प्राण्यांबद्दल आपुलकी असते. गाई, म्हशी, शेळ्या यांपासून दूध मिळते. दुधापासून ताक, लोणी, तूप मिळते. बैल शेतीत कामे करतात. त्यांच्या शेणापासून शेणखत तयार होते. पिकासाठी, धनधान्यासाठी हे शेणखत उपयोगी असते. त्यामुळे शेतकरी या प्राण्यांचे उपकार कधीच विसरत नाही. पारंपरिक लोकसाहित्यात दिवाळीचे महत्त्व शेतक-याच्या व गाई-म्हशीच्या सुख-समृद्धीसाठी असते म्हणून म्हणतात -

“दिन-दिन दिवाई गायी म्हशी ओवायी

गायी म्हशी कोनाच्या रामा लक्शमनाच्या

गोचीळ झळी, गोमाशी झळो सोन्यारूपानं ताट भरो

घरचा धनी मौजा करो ('बयनाचे बोल' , पृ. क्र. 44)

वसुबारसच्या दिवशी गाई-म्हशीची पूजा करतात आणि पोळ्याच्या दिवशी बैलाची पूजा करतात. बाकी वर्षभर त्यांच्याकडून कामेच करवून घेतली जातात. लोकसाहित्यातील दिवाळीसारखी जुन्या पद्धतीची दिवाळी साजरी केली जात नाही.

लोकगीतातील दिवाळीच्या गाण्यांमधील दुसरा प्रकार आहे सासुरवाशिणीच्या गाण्याचा. सासरी सासुरवास असो किंवा नसो मुलीला दिवाळीत माहेरी यायची ओढ असते. त्यासाठी तिला माहीत असते की, आईने भावाला पाठविले असणार आणि भाऊ आपल्याला घ्यायला येईल. त्यामुळे तिची घाई सुरू असते. म्हणून ती सासूला नमस्कार करताना म्हणते, -

"सीता सासूबाई पाया लागतो घाई-घाई

वरसाची दिवाई वाट पायतीन माय बाई' '

('बयनाचे बोल' , पृ. क्र. 43)

लोकगीतातील सासुरवाशीण हळव्या, कोमल मनाची असते. तिला फक्त सासरच्या त्याच त्या वातावरणाचा कंटाळा आला असतो. माहेरच्या लोकांची ओढ तिला वाटत राहते. म्हणून माहेरी येण्यासाठी तिची गडबड सुरू असते. माहेरी आल्यावर ती सासरचा त्रास

सांगत नसली तरी तिच्या वागण्या-बोलण्यावरून ती कशा परिस्थितीत सासरी राहते हे ओळखायला येते.

लोकसाहित्यातील दिवाळीच्या गाण्याचा तिसरा प्रकार आहे गवळणीच्या गाण्याचा. पाडव्याला कृष्णलिलेची गाणी गातात, पुरुष स्त्रीचा वेष घेऊन गवळणी होतात आणि गाणी म्हणत नाचतात. घरोधरी जातात आणि वर्षभराची कमाई म्हणून धन-धान्य, कपडे, पैसे मागून उदरनिर्वाह करतात. तसा हा एक गमतीदार व मनोरंजनाचा प्रकार आहे. काही ग्रामीण भागात आजही दिवाळी संपली की गवळणी घरोघरी गवळण म्हणत नाचत फिरतात -

"गीवन न्हाले बैसली पाची गेगायान न्हाती

आंगी कंचाची धावली' '

('बयनाचे बोल' , पृ. क्र. 44)

यात शंगाराचाही भाग असतो. लोकसाहित्यातील गवळणी नाचताना गीताचे बोल म्हणतात. तशाच नकलाही करतात. त्या सर्वांचे मन मोहवून टाकणार्या असतात. या लोकगीतांची बोलीभाषेत आणि समूह मनातच निर्मिती झाली असते. डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात, लोकगीते लोकसमूहाच्या बोलीत असतात. प्रमाणभाषेत कधीही नसतात." ह्या लेखिकेने ग्रामीण बोलीभाषेचा वापर केलेल्या पारंपरिक लोकगीतांचा वापर करूनच ललित लेखामध्ये समावेश केला आहे असे दिसते. त्यामुळे लोकगीताची भाषा समाजाला साधी व सोपी वाटते. समूहातच त्याची निर्मिती झाली या वास्तवतेला अनुसरुन लोकगीताची स्वरूप व वैशिष्ट्ये सांगताना डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात, लोकगीते ही समूहमनाची

निर्मिती असल्यामुळे त्यातून समूहगानाला निराळेपणाचा त्यातून आविष्कार झालेला नसतो.'' गाण्यांचे विवेचन करताना त्यात समूहमनाच्या निर्मितीमुळे व्यक्तिमनाचा निराळेपणा दर्शविला नाही.

अशाप्रकारची लोकसाहित्यातील दिवाळी गाण्यांच्या तालावर हसत, नाचत, बागडत येते तसा आजच्या दिवाळीला बहर येत नाही. दूरदर्शन, प्रचार व प्रसार यांच्या माध्यमातून नवनवीन निर्मिती होत असलेल्या गाण्यांमुळे लोकसाहित्यातील गाणी काळाच्या पडद्याआड लोप पावू नयेत असे प्रकर्षाने वाटते. त्यासाठी ह्या लेखिकेचे प्रयत्न आहेत..

प्रकाश मुनघारे म्हणतात लोकसाहित्य आणि लोककथा या मानवी उत्क्रांतीच्या टप्प्यातील संस्कतीचे एक अविभाज्य अंग आहे. त्यांच्या अभ्यासाशिवाय मानववंश शास्त्राचा व संस्कृतीचा अभ्यासही पूर्ण होत नाही' इंगोले यांचा बयनाचे बोल' आणि 'झेंडवाईचे दिवे' या ललित लेखसंग्रहातून लोकसाहित्य, लोककथांचा आणि लोकसंस्कृतीचा अभ्यास करण्याची भूमिका व प्रेरणा स्पष्ट दिसते.

एकंदरीत प्रस्तुत लेखिकेने आपल्या ललित साहित्याची भूमिका मांडताना लोकसाहित्य जतन या पाहिजे. ते आपल्या संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे अशी भूमिका घेतलेली जागोजाग दिसते. हीच त्यांच्या लेखनाची प्रेरणा आहे असे जाणवते.

- ललितलेखनाचे विषय वैविध्य

## संदर्भ ग्रंथ -


1) विष्णु नारायण जुगांदे - ‘समुद्रमंथन-विष की अमृत ?’, पृ. 116

2) डॉ. प्रभाकर मांडे, ‘लोकसाहित्याचे स्वरूप’ , पृ. 243

3) डॉ. मधुकर वाकोडे, ‘लोकप्रतिभा आणि लोकतत्त्वे,’ 1994, पृ. 104

4) प्रभाकर मांडे, ‘लोकसाहित्याचे अंत:प्रवाह’ , गोदावरी प्रकाशन औरंगाबाद 1997, पृ. 237.

5) तत्रैव, पृ. 243

6) प्रमो मुनघारे, ‘‘पथनाटक आणि लोकनाटक’ ’ - ‘आमची बोली’ , संपा. विठ्ठल वाघ, शिवाजी त्रि. प्रेस, आकोला, 1987 पृ. क्र. 101.

7) डॉ. सौ. प्रतिमा इंगोले, ‘झेंडवाईचे दिवे’ , प्र. क्र. 65

8) डॉ. शुभांगी पातुरकर, दै. ‘लोकमत’ (नागपूर), रविवार, 2001, पान नं. 6.

9) डॉ. मधुकर वाकोडे, उनि., पृ. क्र. 67.

10) डॉ. आनंद यादव, ‘समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे